शिक्षण सेवक या पदावर अनुकंपा
नियुक्ती देण्याबाबची कार्यपध्दती.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०३/टिएनटी-१

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० जानेवारी, २०१६

**वाचा -**

१) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. अकंपा-१००४/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दि. २६ ऑक्टोबर, १९९४
२) शासन निर्णय शा. शि. व क्री. विभाग क्र.एसएस एन-२६९५/(३९६/०५)/माशि-२ दि. ३१ डिसेंबर, २००२.
३) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. अकंपा-२०१४/प्र.क्र.२६/आस्था-९, दि. २० ऑगस्ट, २०१५.

**प्रस्तावना -**

राज्यात शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकांस नेमणूक देण्यासंबंधीची अनुकंपा तत्वावरील नियुक्तीची योजना संदर्भाधिन क्र.१ वरील शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे व त्यानंतर त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत.तसेच सदर योजना खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित) शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनाही संदर्भाधिन क्र.२ वरील शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. तथापि सद्यस्थितीत राज्यातील सर्व व्यवस्थापनांतर्गत येणा-या शाळांमधील शिक्षकांची रिक्त होणारी पदे कंत्राटी तत्वावर दि. १०.३.२००० च्या शासन निर्णयान्वये लागु करण्यात आलेल्या व दि.२७/०२/२००३ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आलेल्या शिक्षण सेवक योजनेनुसार भरण्यात येतात. सदर पदे ही कंत्राटी स्वरुपाचे असल्याने अनुकंपातत्वाने भरण्यात येत नव्हती.

सद्यस्थिती अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादीवर असलेल्या उमेदवारांची संख्या विचारात घेता, त्यांना अनुकंपा नियुक्तीसाठी अपरिहार्यपणे काही कालावधी लागतो. त्यामुळे जिल्हा स्तरावर कार्यरत शिक्षण सेवक, ग्रामसेवक व कृषि सेवक यांना कंत्राटी पध्दतीवरील पदांसाठी अनुकंपा नियुक्ती देय करता येईल काय ही बाब राज्याच्या अनुकंपा व प्रकलग्रस्त नियुक्ती धोरणाचा आढावा घेण्यासाठी मा. मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ उपसमितीच्या विचाराधीन होती. त्याबाबत सविस्तर उहापोह करुन ग्रामविकास विभागाने संदर्भाधिन क्र.३ वरील शासन निर्णयान्वये कंत्राटी ग्रामसेवकांची पदे अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी अनुज्ञेय ठरविली आहेत. त्यानुषंगाने शिक्षण सेवकांची पदे अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी अनुज्ञेय ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

**राज्यातील सर्व व्यवस्थापनांतर्गत येणा-या शाळांमधील शिक्षण सेवकांच्या पदांवर अनुकंपा नियुक्ती देण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-**

१) अ) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी ( अनुदानित व विनाअनुदानित ) प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, अध्यापक विद्यालय तसेच विद्यानिकेतन सैनिकी शाळा मध्ये शिक्षण सेवक म्हणून अनुकंपाने नियुक्ती मिळण्याकरिता संबंधित अनुकंपाधारकास संदर्भाधिन क्र. २ च्या शासन निर्णयातील संबंधित अटी व शर्ती लागू राहतील.

ब) स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत शाळेमध्ये शिक्षण सेवक म्हणून अनुकंपाने नियुक्ती मिळण्याकरिता संबंधित अनुकंपाधारकास सामान्य प्रशासन विभागाने पारित केलेल्या संदर्भाधीन क्र १ च्या व यामध्ये वेळोवेळी सुधारणा केलेल्या शासन निर्णयातील संबंधित अटी व शर्ती लागू राहतील. **नियुक्तीच्या वेळी सदर अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र संबंधित उमदेवाराकडून घेण्यात यावे.**

२) **अनुकंपा योजनेंतर्गत नियुक्ती देण्यात आलेल्या शिक्षण सेवकास दि. १०.३.२००० च्या शासन निर्णयान्वये लागु करण्यात आलेल्या व दि.२७/०२/२००३ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आलेल्या शिक्षण सेवक योजनेतील मानधन/वेतनासंबंधीच्या व इतर अटी व शर्ती लागु राहतील.**

३) सदर पदावर अनुकंपा तत्वाने शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती देतांना संबंधित अनुकंपाधारक हा शिक्षण सेवक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता धारण करणारा असावा.मात्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) व केंद्रिय भरतीपूर्व निवड परीक्षा या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीमधून त्यांस सवलत राहील.

४) नियुक्ती कंत्राटी पदावर असल्याने सदर पदासाठी असलेल्या सेवाप्रवेश नियमातील सर्व अटी व शर्ती यांच्या अधीन राहून कंत्राटी पदासाठी असलेले मानधन/ वेतन अनुज्ञेय राहील.

५) मुळ नियुक्तीच्यावेळी शै.अर्हता धारण करीत असूनही गट “क” मधील पद उपलब्धते अभावी गट “ड” मध्ये नियुक्ती दिली असेल असा कर्मचारी शिक्षण सेवक पदावरील अनुकंपा नियुक्तीसाठी इच्छुक असेल तर अशा कर्मचा-यांनाही कंत्राटी शिक्षण सेवक पदासाठी असलेले मानधन/वेतन व सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमातील सर्व अटी व शर्ती लागु राहतील. नियुक्तीच्या वेळी सदर अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र संबंधित उमदेवाराकडून घेण्यात यावे.

६) स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी संस्थांतर्गत असलेल्या शाळांमधील शिक्षण सेवकांचे पद अनुकंपा तत्वावर भरण्याबाबत वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी पारित केलेले शासन निर्णय योग्य त्या फेरफारासह लागु राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२०१५३५५६१४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2016.01.20 15:38:20 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
**उप सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा. मंत्री ( शालेय शिक्षण )
३) मा. राज्यमंत्री ( शालेश शिक्षण )
४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
५) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
६) सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) सर्व आयुक्त, महानगर पालिका,
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१३) शिक्षण संचालक, ( प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे.
१४) शिक्षण संचालक, ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे.
१५) शिक्षण संचालक, ( प्रौढ शिक्षण ) महाराष्ट्र राज्य पुणे.
१६) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१७) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ( बालभारती), पुणे.
१९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२०) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
२१) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद.
२२) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद.
२३) सर्व प्रशासन अधिकारी, नगर परिषद/ कटक मंडळे,
२४) शिक्षण निरीक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मंबई.
२५) निवड नस्ती (टिएनटी-१ कार्यासन).